# सुरुवात




## मंगेश हिवाळे

# सुरुवात... एक निमित्त

## मंगेश हिवाळे

ई साहित्य प्रतिष्ठान

# सुरुवात... एक निमित्त

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

सुरुवात… एक निमित्त (लघुकादंबरी)

संपूर्ण नांव:- मंगेश हिवाळे

mngshhwl@gmail. com

Whats app Phone Number : 9730437998

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २४ ऑक्टोबर २०१८

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे .



## *प्रस्तावना*

पहिल्यांदा जेव्हा डोळे उघडले, तेव्हा स्वतःला मी एका नैसर्गिक ठिकाणी असलेले पहिले. ते स्थळ इतके रम्य होते कि आता तसे एखाद्या पुस्तकात वर्णन ही सापडणार नाही.

मी तर खूपच लहान होतो तेव्हा, मात्र त्या भारलेल्या वातावरणाचा माझ्या कोवळया मनावर जो व्हायचा तोच परिणाम झाला. माझ्या लहान मनाला कविता सुचू लागल्या. विश्वास नाही बसणार पण मला काव्य शब्दात मांडताही येत नव्हते तेव्हापासून मला कवितेची गोडी लागली. आणि नंतर मग भय कथा वाचून मलाही एखादी कथा लिहावी असे  वाटू लागले. त्याचा हा

छोटासा प्रयत्न. कथेतील सर्व पात्रे काल्पनिक आहेत, काही साधर्म्य आढळल्यास केवळ योगायोग समजावा..

.. धन्यवाद.

मंगेश हिवाळे

९७३०४३७९९८

mngshhwl@gmail. com

feedback required …

# एक....

नेहमीची सकाळ आज भयाण, सुनसान भासत होती. दिवस तर निघाला होता पण का कोण जाणे अभद्रतेचे सावट अजूनही तिथे भिरभिरत होते. इनमिन २०-२५ जण जगले होते. ते पण तेच जे शरणी आले होते.

एका दुखःद स्वप्नासारखे सर्व जण ती रात्र विसरू इच्छित होते. पण ती रात्र वारंवार प्रत्येकाच्या डोळयासमोर उभी राहत होती. जेमतेम एका घरातून एक असे खूप कमी लोक जिवंत होते.

सर्वांना वाटत होते संकट टळले, पण ही तर फक्त सुरुवात होती. एक भयानक सुरुवात.....



# दोन……

धांदरवाडी. एक निसर्गाच्या कुशीत वसलेले छोटेसे खेडे गाव. गावाजवळून वाहणारी स्वच्छ सुंदर नदी, एका बाजूने जिवंत असलेले ज्वालामुखीचे ज्वलंत उगमस्थान, अन एका बाजूला समस्त गावकऱ्यांची शेतीवाडी. पर्यटकांची नेहमी ये जा रहायची. जवळच जो डोंगर होता, त्यावर एक मोठे मैदान होते. सर्व पर्यटक तिथे आवर्जून कॅम्पिंग करायचे.

अशाप्रकारे हे गाव आपल्याच मस्तीत मग्न होते.

या गावातील महत्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे येथील सरपंच.

भाऊसाहेब हे बुटक्या व्यक्तिमत्त्वाचे असले तरी विचार मात्र खूप उंच होते. त्यांची लोकोपयोगी काम बघून लोकांनी सलग पाच वेळा निवडून दिले होते. भाऊ जरी

कमी शिकलेले असले तरी त्यांनी शिक्षणाकडे नेहमी आद्यदेवतेप्रमाणे पाहिले. जे पालक मुलांना शाळेत पाठवीत नसे त्यांना भाऊंनी दंड लावला.

भाऊंना एक मुलगा होता. कुमार नाव त्याच. व्यक्तिमत्त्व म्हणजे अगदी बापाच्या विरुद्ध. खूप समजावलं तरी, स्वारी आपल्याच तालात. भाऊंच्या जीवाला हाच एक घोर होता.

नेहमी सारखी एक सकाळ होती. आज मात्र खूप गाड्या आल्या होत्या गावात. नेमकीच गावात किडन्या –चोरांच्या अफवा होत्या, म्हणून जो तो त्या डोंगराकडे जाण्यापासून आपापल्या लहान मुलांना समजावून सांगत होता. आज गाड्याही विचित्र होत्या. जणू महिन्याभरासाठी कुणी राहायला आलं असावं.

नेहमी येणारे पर्यटक सरपंचाला आवर्जून भेटायचे. हे मात्र पहिल्यांदा झालं होत. सरपंचानी दुर्लक्ष केले.

# तीन.....

“सोनू, आज मला त्या डोंगरावर भेटशील का?”.

पियुष सोनू ला म्हणाला.

पियुष.. एक B. SC होल्डर, पण बेरोजगार. वडिलांसोबत शेती बघायचा. आपले जीवशास्त्राचे प्रयोग करून बघायचा. सोनूवर जीवापाड प्रेम करायचा. पण बोलायला घाबरायचा. आजच ‘अंदाज’ ही फिल्म बघून आलेल्या पियुष च्या मनात ‘किसी से तुम प्यार करो… ’ हे गाणे चालले होते.

सोनूचं अन त्याचं शेत डोंगरावर जवळ-जवळ होते.

सोनू एक गावातील सुंदर अन हूड मुलगी. खूप हट्टी अन प्रेमळही तितकीच. आपल्या आजीसोबत रहायची गावात. वडिलांनी आत्महत्या केलेली.. आई पण कसल्याश्या आजाराने बिचारीला एकटी सोडून गेलेली. तेव्हापासून आजीसोबत रहायची या गावात.

“कशासाठी रे ?”..

“काम होत”....

“मग इथंच सांग कि”...

“नको, तू भेटशील कि नाही ते सांग?”...

“....... ”...

“मी वाट बघेन... ”...

ती निघून गेली. याला उगीचच ‘ती लाजली’ अस वाटून गेलं.



# चार......

मोठ्या लवाजम्यानिशी डॉ. जाधव डोंगरावर पोहोचले होते. सर्वजण दिलेल्या कामात दंग होते. काहीही करून दोन दिवसात सगळी तयारी करायची होती. थर्मल कॅमेरे सेट केले गेले. सर्वत्र लाल लाईट्स लावण्यात आले. सर्वांनी आपापले चांदीची हत्यारे घेतली. पण अजून दोन दिवस वेळ होता. सर्वांना परत एकदा सूचना देण्यात आल्या.

“आज जरी कृत्य अधिकृत नाही तरी पण हे आपल्यालाच करावे लागणार आहे, असं समजा संपूर्ण मानवजातीची जबाबदारी आपल्या खांद्यावर आहे. परवा कुणीही कसलीही चूक करू नका. तुमची एक चूक सर्व मानवजातीला धोका उत्पन्न करू शकते. so be carefull. काही शंका आहेत का?”डॉ. जाधव....

“सर, पण त्यांना जर ही डील मान्य नसेल तर?”..

“Be Positive मि. दीक्षित, आपण सकारात्मक विचार करूयात का?अस पण शेवटी त्यांच्या हातात आहे, पण आपण एक प्रयत्न करायला काय हरकत आहे?आणि समजा नाही ऐकले त्यांनी तर आपण त्यांना या हत्यारांनी नक्की मात देऊ शकू. ”

## दोन दिवसानंतर..................

“तू काल का नाहीस आली, मी खूप वाट बघितली. तू का त्रास देत आहेस मला. ”..

“अरे माझ्या आजीची अचानक तब्येत बिघडली, अन मला थांबावं लागलं. तूच सांग न कोण आहे तिच्याशिवाय माझं?” तिचा स्वर रडवेला झाला..

“अच्छा?मग मी कुणाचा?”...

“माझाच आहेस न सोन्या. चाल ना घरी जाउयात आता. अंधार पडतोय. इतक्या अशा वेळी या डोंगरावर थांबणं मला नाही ठीक वाटत. ”

“जाऊ न बाळ, बघ तरी क्षितीज कसं भासतंय, जणू काही आकाश खुणावतंय आपल्याला. मला सोडणार नाहीस न कधी?”

“ए, ते बघ काय ते?”...

“कसला प्रकाश आहे हा निळसर, अरेरे, हे तर UFO आहे. ”...

“ते काय असत”....

“ते म्हणजे, अं ते.... सोड न चाल तिकडे.. ”..

आता मात्र सगळीकडे लाल भडक प्रकाश पसरला होता. ते यंत्र जमिनीवर उतरलं. काही क्षणातच त्या यंत्राला एक द्वार दिसू लागले;ते द्वार उघडून त्यातून एक विचित्र वस्तू बाहेर आली. दिसायला किंचित मानवासारखी ही वस्तू अगदी लवचिक वाटत होती. एका मोठ्या जाळीच्या आडोश्यात लपून हे प्रेमी युगुल हा थरार अनुभवत होत.

अचानक कसलातरी आवाज आला जसे कि एखाद्या वादळात एखादा पत्रा जमिनीला घासतो आहे, पण ती मानवी वस्तू मानवी भाषेत गूढ रित्या बोलत होती.

“तुम्हाला दिलेली मुदत संपली आहे. सांगा आता तुमची पृथ्वी कशाप्रकारे नष्ट करु आम्ही?”..

“तुम्हाला हवं ते दिलं आम्ही. आपला जो करार होता, त्यात असं नव्हतं. मग आज अचानक असं का बोलतो?”..

आणि त्या प्राण्याने विचित्र आवाज काढला. त्या पाठोपाठ बरेच तसे दिसणारे प्राणी बाहेर आले. इकडे डॉ. जाधवांनी इशारा केला. त्या बरोबर एका गटाने त्या प्राण्यावर मारा केला. सर्व प्राणी विचित्र ओरडत धुळीत मिळाले. सर्व जण हसू लागले. ते यंत्र crash करण्यात आले. सर्व आता जाण्याचा तयारीत होते. या सर्वांच्या

व्यतिरिक्त त्या घटनेचे अजुनाही दोन साक्षीदार होते. पियुष ने मागे वळून बघितले.... सोनू नव्हतीच ती. नक्कीच नव्हती. सोनू च्या वेशात तो परदेशी sorry परग्रही प्राणी होती. काही समजायच्या आत पियुष च शरीरही अगदी तसच झालं, जसा तो प्राणी दिसत होता.

......... आणि सर्वत्र स्मशान शांतता पसरली. डॉ. जाधव आणि टीम एव्हाना रवाना झाली होती. मागे एक नवीन समस्या सोडून.......



Chapter 1s closed………. will be meet soon.

Thank you

पुढील भागासाठी संपर्क साधा

mngshhwl@gmail. com

Whats app Phone Number : 9730437998

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत

राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत
ई साहित्य प्रतिष्ठान